महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पीआर-३/पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना/४०१२८** **दिनांक : २४.११.२०१५**

# वाणिज्य परिपत्रक क्र. २५२

**विषय : राज्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी "पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना-२०१५" राज्यात लागू करण्याबाबत.**

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र.पापुयो-२०१५/प्र.क्र.५५/ऊर्जा-५ दि.१९.११.२०१५.
२) शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७ दि.२०.१०.२०१५.

महावितरण कंपनीतर्फे वीज बिलाच्या वसूलीसाठी नियमितपणे मोहिमा राबविण्यात येत असून, त्यामुळे पाणी पुरवठा योजनांच्या बिलांचा सुध्दा समावेश आहे. चालू वीज बिलाचा भरणा न केल्यास पाणी पुरवठा योजनांचा सुध्दा वीज पुरवठा नाईलाजास्तव खंडीत करण्यात येतो. सद्य:स्थितीत राज्यात बऱ्याच ठिकाणी पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा थकबाकी असल्यामुळे खंडीत करण्यात आला आहे. एकंदरीत चालू योजनांपैकी बहुतांश योजनांची मोठी थकबाकी असल्यामुळे त्यांचादेखील वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वरील परिस्थितीत राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई व त्यावर मात करण्यासाठी संबंधित पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा सुरळीत ठेऊन जनतेस पिण्याची पाण्याची उपलब्धता होण्यासाठी सदर पाणी पुरवठा योजनांना सवलत देऊन त्यांचा वीज पुरवठा चालू ठेवण्यासाठी शासनाने राज्यात "पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना-२०१५" लागू करण्याबाबत संदर्भिय शासन निर्णयाद्वारे मान्यता दिलेली आहे.

"पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना-२०१५" ची वैशिष्टे खालील प्रमाणे आहे.

१) या योजनेत स्वेच्छेने सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था यांनी जून, २०१५ अखेर असणाऱ्या वीज बिलाच्या मूळ थकबाकी रक्कमेपैकी ५०% रक्कम एकरकमी किंवा दहा सलग समान मासिक हप्त्यात महावितरणकडे भरावी. या योजनेच लाभ घेण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी जुलै,२०१५ पासूनची चालू विजेची बिले विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे. याशिवाय ८० % पाणीपट्टी वसुली असणे आवश्यक आहे. शहरी भागांमध्ये पाणी चोरीचे प्रमाण ५०% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

२) ही योजना पहिल्या टप्प्यामध्ये, राज्यात यावर्षी जाहीर कराण्यात आलेल्या दुष्काळग्रस्त गावांमध्ये राबविण्यात यावी. त्याकरिता मात्र उपरोक्त पाणीपट्टी वसुली व पाणी चोरीचे प्रमाण या संबंधीच्या अटी लागू राहणार नाहीत.

३) दुष्काळग्रस्त गावासंदर्भात शासन निर्णय संदर्भ क्र. २ व यापुढे निर्गमित होणारे शासन निर्णय लागू राहील.

४) मूळ थकबाकीची दहा मासिक हप्त्यांची रक्कम व चालू वीज बिलाची रक्कम संबधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे सामान्य खर्चाचे अकाऊंट, इस्क्रो अकाऊंटमध्ये रुपांतर करुन महावितरण कंपनीस अदा करावी. स्थानिक स्वराज्य संस्थांनी या योजनेत सहभागी होण्यापूर्वी किंवा या शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यांचे सामान्य खर्चाचे अकाऊंट, इस्क्रो अकाऊंटमध्ये रुपांतरित करुन घेणे आवश्यक राहील. या योजनेत सहभागी न होण्याऱ्या थकबाकीदार पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही महावितरण कंपनीकडून होईल.

५) इस्क्रो अकाऊंट उघडण्याची मुदत शासनाच्या संबंधित विभागाने अधिसुचना निर्गमीत केल्यापासून एक महिना राहील.

६) पाणीपुरवठा ही अनिवार्य नागरी सुविधा असल्याने शासनातर्फे भरण्यात येणारी मूळ थकबाकीची उर्वरित ५०% रक्कम, या योजनेत स्वेच्छने सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना, त्यांना चौदाव्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून त्या संस्थांमार्फत महावितरण कंपनीस अनुदान स्वरुपात देण्यात येईल.

७) महावितरण कंपनीमार्फत या योजनेत सहभागी होणाऱ्या पाणीपुरवठा योजनांच्या वीज बिलाच्या थकित रकमेवरील संपूर्ण व्याज व दंडाची रक्कम माफ करण्यात येईल.

८) वरील योजनेत स्वेच्छेने सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना वीज बिलाची मूळ थकबाकीची रक्कम आणि व्याज व दंड याबाबत येणारा आर्थिक दायित्वाचा तपशील खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | बाब | आर्थिक दायित्वाचे प्रमाण | प्राधिकरण | आर्थिक स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १. | जून,२०१५ अखेर वीज बिलाच्या मूळ थकबाकीची रक्कम | ५०% | स्थानिक स्वराज्य संस्था | स्वतःच्या उत्पन्नातून |
| | | ५०% | शासन | १४ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून |
| २. | व्याज व दंड | १००% | महावितरण | रक्कम माफ करणे |

९) दुसऱ्या टप्प्यामध्ये ही योजना राज्यातील उर्वरित भागांमध्ये राबविण्यासाठी मंत्रीगट नियुक्त करण्याबाबत ऊर्जा विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१०) इस्क्रो अकाऊंटच्या कार्यवाहीबाबतीत महावितरणतर्फे संबंधित मंडळाचे वरिष्ठ व्यवस्थापक (वि.व ले.) पाठपुरवा करतील.

सदर योजनेचा परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी. तसेच सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ग्रामसभा, ग्रामपंचायतीचे सदस्य, पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे सभासद व स्थानिक लोकप्रतिनिधींना संपर्क साधून "पेयजल पाणीपुरवठा संजीवनी योजना-२०१५" ला प्रसिध्दी द्यावी तसेच सदर योजनाबाबत अवगत करुन देण्यात यावे.

वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होईल याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**